MERC
Date 28/04/05
No... 2905

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ पुनर्रचना
पुनर्रचित कंपन्यांची नोंदणी करण्याकरिताआवश्यक
असलेल्या शेअर साठी निधी मंजूर करणे.

**महाराष्ट्र शासन**
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांक रिफार्म-१००४/प्र.क्र.८८८५/ऊर्जा-५
मंत्रालय,मुंबई-४०००३२.
दिनांक:-१७.२.२००५.

वाचा:- १) शासन निर्णय क्रमांक ईएलए-१००३/प्र.क्र.८५८८/भाग-२/ऊर्जा-५ दिनांक २४ जानेवारी, २००५.
२) सिकॉमचे क्र.सीई /सीपी /२६८४, दिनांक १७.११.०४ चे पत्र.

**प्रस्तावना:-**

विद्युत अधिनियम, २००३ ची राज्यात दि.१० जून,२००३ रोजी अंमलबजावणी झाल्यामुळे त्यातील तरतुदीनुसार विद्युत मंडळाची पुनर्रचना करण्याचा निर्णय संदर्भाधीन दि.२४.१.२००५ च्या आदेशान्वये शासनाने घेतला आहे. या आदेशानुसार विद्युत मंडळाची कामे व मालमत्ता खाली नमूद केलेल्या चार शासकीय कंपन्याकडे सोपविण्यात येणार आहेत.

अ) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ होल्डींग कंपनी :-

या कंपनीकडे पुनर्रचित पारेषण वीज निर्मिती व वितरण कंपनी यांच्या भागभांडवलाची मालकी राहील)

ब) पारेषण कंपनी:-

विद्युत अधिनियम,२००३ मधील कलम ३९ प्रमाणे ही शासकीय कंपनी राहील. या कंपनीकडे स्टेट लोड डिस्पॅच सेंटरचे (.SLDC) काम रहाणार असून मंडळाच्या ६६ के.व्ही.(धरुन) आणि त्यावरील पारेषण प्रणाली राहील.

क) वीज निर्मिती कंपनी : -

या कंपनीकडे मंडळाची सर्व वीज निर्मिती केंद्र रहातील.

ड) वितरण कंपनी:-

या कंपनीकडे ६६ के.व्ही.(सोडून) खालील सर्व वितरण प्रणाली रहातील.

या चारही कंपन्यांचीं नोंदणी तत्काळ करणे आवश्यक आहे. ही नोंदणी करण्याकरीता शेअर अलॉटमेंट करीता प्रत्येकी ५ लाख रुपये देणे आवश्यक आहे. त्याशिवाय स्टॅम्पडयुटी व इतर आवश्यक फी देण्याकरिता प्रत्येकी रु. १०,५००/- आवश्यक आहेत. (यामध्ये सर्विस टॅक्सचा समावेश नाही ) हे लक्षात घेऊन या चारही कंपनीकरिता प्रत्येकी रु. ५ लाख २० हजार, प्रमाणे एकूण रु. २०.८० लक्ष देणे आवश्यक आहे. यासाठी अर्थसंकल्पीय तरतुद नसल्यामुळे व ही सर्व कामे तातडीने करणे आवश्यक असल्यामुळे आकस्मिकता निधीमधून रु.२०.८० लक्ष अग्रीम धन घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

## शासन निर्णय :

विद्युत अधिनियम, २००३ मधील असलेल्या तरतुदीनुसार विद्युत मंडळाची पुनर्रचना करुन त्यांची कामे व मालमत्ता चार पुनर्रचित शासकीय कंपन्याकडे सोपविण्याचा निर्णय दि. २४.१.२००५ अन्वये घेण्यात आलेला आहे. या शासकीय कंपन्याची नोंदणी करण्याकरिता शेअर कॅपिटल आवश्यक असून प्रत्येक कंपनीकरिता रु. ५ लाख (रु.१० "प्रति शेअर "प्रमाणे एकुण ५०,००० शेअरस् ) तसेच स्टॅम्पडयुटी व इतर अनुषंगिक खर्चाकरिता प्रत्येक कंपनीकरीता रु.२०,०००/- याप्रमाणे एकूण रु. ५ लाख २० हजार प्रत्येक कंपनीसाठी व चार कंपन्याकरिता रु.२०.८० लक्ष (रु.वीस लक्ष ऐंशी हजार फक्त) निधीस शासन मंजूरी देत आहे.

यासाठी येणारा खर्च वित्त विभाग शासन ज्ञापन क्रमांक आकनि-११०५/ ११२/ अर्थसंकल्प-१३ दि.२७.१.२००५,संगणक सांकेतांक क्र.८०००-११२ ८ अन्वये मंजूर करण्यात आलेल्या आकस्मिकता निधीमधून भागविण्यात यावा व मागणी क्रमांक: के-७-३४५१-सेक्रेटरिएट आर्थिक सेवा-०९०-सेक्रेटरिएट (००)(०१) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग (३४५१००७३) या लेखा शिर्षाखाली नोंदविण्यात यावा.

वरील रक्कम अधिदान व लेखा अधिकारी यांच्यामार्फत कोषागारातून काढून पुनर्रचित नवीन कंपन्याना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून अवर सचिव, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, रोख शाखा, मंत्रालय,मुंबई-३२ यांना नियुक्त करण्यात येत आहे. आहरण व संवितरण अधिका-यांनी कोषागाराकडे आकस्मिकता निधीतून करण्यात येणारा खर्चा संबंधी देयक पाठवितांना खालील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१) देयकावर आकस्मिकता निधी अग्रिम शासन ज्ञापन वित्त विभाग क्र.आकनि ११०५ / ११२ / अर्थसंकल्प-१३,दिनांक २७.१.२००५ संगणक संकेताक ८०००-११२८अशी नोंद लाल शाईने करण्यात यावी.

२) आकस्मिकता निधीतून करण्यात येणा-या खर्चासाठी काढावयाची रक्कम वेगळी देयक पाठवून काढावी.

३) देयकासोबतच्या पोच पावतीवर लेखाशिर्ष व संकेतांक आणि खर्चाचा संकेतांक नमूद करावा. ही रक्कम ज्या कामासाठी मंजूर करण्यात आली आहे. त्याच कामासाठी दिनांक ३१.३.२००५ पर्यंत उपयोगात आणली जाईल असे नियंत्रण अधिकारी यांनी पहावे व ते त्यास जबाबदार धरले जातील.

नियंत्रक अधिकारी यांनी महाराष्ट्र राज्य अर्थसंकल्प नियमावली (खंड-१) १९९७ मधील परिच्छेद १९१ नमूद केलेल्या मुद्यांचा अवलंब करुन आकस्मिकता निधीच्या अग्रिम रक्कमेतून होणा-या खर्चाचे विवरण पत्र योग्य त्या प्रपत्राव्दारे शासनास वेळीच सादर करावे. आकस्मिकता निधीच्या अग्रिम रक्कमेतून खर्च कोणत्या तारखेस करण्यात आला याचा अहवाल विहित नमून्यात सादर करावा. आकस्मिकता निधी अग्रिमातून करण्यात येणा-या खर्चाचा सतत मेळ नियंत्रण अधिकारी यांनी घालावा व अनावश्यक खर्च टाळावा.

नियंत्रक अधिकारी यांनी शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. सीएनएफ-१०८३/ १४०/ बीयूडी ३, दिनांक २६.४.१९८३ व क्र.सीएनएफ १०८६/१५३/अर्थसंकल्प-३, दिनांक २८.८.१९८६ अन्वये निर्गमित सूचनांचे पालन करावे.

हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५/०५ /व्यय-१६, दिनांक ५.१.२००५ व अर्थोपाय अनौपचारिक संदर्भ क्र.५९०/अर्थोपाय दिनांक १.२.०५ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(अरविंद पाटील)
शासनाचे अवर सचिव.

प्रति,

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
अध्यक्ष,महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,मुंबई (५प्रती)
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,प्रकाशगड, वांद्रे (पूर्व),मुंबई-५१ (५प्रती)
व्यवस्थापकीय संचालक,सिकॉम,मुंबई ( ५प्रती)
एसबीआय कॅपिटलस्,मुंबई (५प्रती)
मा.मंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव.
मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव.
महालेखापाल १ / २ (मुंबई /नागपूर) (लेखा परिक्षा /लेखा व अनुज्ञेयता)
अधिदान व लेखाधिकारी. मुंबई.